# नियमित दिवाणी दावा क्र.५२७/२०१९ मधील नि.१ खालील आदेश

प्रस्तुत दाव्यातील अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, बेलिफ यांचेकडील रिपोर्टनुसार, प्रतिवादी नं. ८ यांना **नि. १०** अन्वये, दि.१७.०१.२०२० रोजी समन्सची बजावणी करता गेले असता, सदर प्रतिवादी यांनी समन्स रुजु करुन घेण्याचे नाकारले. सबब समन्स न बजावता परत आले. सदर प्रतिवादी नं. ८ हे प्रस्तुत दाव्याकामी दि. ३०.०१.२०२० रोजी स्वतःहुन हजर होवुन त्यांनी **नि.१४** अन्वये वकीलपत्र दाखल केले आहे.  तसेच कैफियत देण्यासाठी मुदतीचे अर्ज, दि.३०.०१.२०२०, **नि.१६** आणि दि.१८.०१.२०२० रोजी **नि.१७** अन्वये, अभिलेखावर दाखल केले होते. सदर अर्ज मंजुर करण्यात आले होते. परंतु आजअखेर ते आपली कैफियत देण्यात अपयशी ठरले आहेत. तसेच आजही वारंवार पुकारुन सुध्दा ते न्यायालयांत हजर राहीलेले नाहीत. त्यामुळे सदर दावा प्रतिवादी नं. ८ यांचेविरुध्द विना कैफियत चालविणेत येतो.

PRAJAKTA GAJANAN SHELAR
Digitally signed by PRAJAKTA GAJANAN SHELAR
Date: 2022.09.29 13:32:09 +0530

दि.२९.०९.२०२२ (श्रीमती पी.जी.शेलार)

ठिकाण–कराड ७वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कराड